वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर २०२५ पाने ४ किंमत ३

# शहरवासियांनो, तुमचं एक अमूल्य मत बीडच्या विकासाला चालना देणार राहिल

## पैसे घेवून मत देवू नका, ते तुमच्यासाठी आणि तुमच्या कुटूंबियांसाठी पाच वर्षे पश्चातापाचे राहतील

### गांभीर्यपुर्वक विचार करा, खरंच बीड शहराचा विकास झाला का?

तुम्ही स्वत: विचार करा, तुमच्या कुटूंबियांना, तुमच्या नातेवाईकांना, तुमच्या शेजारील लोकांनाही विचार करायला लावा, आपण या पुर्वी दिलेले मत वाया तर गेलं नाही ना?, आता २ तारंखेला तुम्हाला विचार करायचा आहे, मागच्या प्रमाणे मतदान करायचं की परिवर्तनासाठी मतदान करायचं

Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com


दिव्य वार्ता

# ३५ वर्षे ज्यांनी एका हाताने सत्ता भोगली त्यांनी तुमच्या बीड शहराचा विकास केला का?

बीडकरांनो, लक्षात असू द्या बीडच्या नगर पालिकेला ३५ वर्षात तुमच्या कॅल्क्युलेटरवर आकडा बसणार नाही एवढा निधी शासनाने दिला पण आज बीड शहराचा विकास गुंदमरतोय

१२७ कोटींला तांत्रिक मान्यता दिली, ११४ कोटी रूपयांची आर्थिक तरतुद केली पण त्यामध्ये ही या राज्यकर्त्यांनी भ्रष्टाचार करून १०२ कोटी रूपये पाण्यात घातले आणि आज बीडकरांना पाण्या पाण्यासाठी तरसावे लागते, याची जबाबदारी कोण घेणार?

बीडकरांनो, तुम्ही आजारी पडू नये, तुमच्या घरातल्या लहान मुलांना, वृध्दांना डेंगू, मलेरिया, टाईफाइड सह इतर दुर्मिळ आजार होवू नये म्हणून केंद्र आणि राज्य सरकारने बीड शहराला अमृत अभियान अंतर्गत मलनिस्सारण करीता १६५ कोटी रूपयांची आर्थिक मंजूरी केली यामध्ये कोणी भ्रष्टाचार केला? १९ कोटी रूपये खर्च करून योजना बंद केली याची जबाबदारी कोणा घेणार?



आज बीड शहरात एकही मोठे उद्यान नाही, ३५ वर्षात का करता आले नाही?







बीडकरांचें आरोग्य चांगले रहावे, तंदुरूस्त रहावे, स्वच्छ त्यांना पिण्यासाठी पाणी मिळावे म्हणुन केंद्र आणि राज्य सरकारने अमृत पाणी पुरवठा योजना मंजूर केली

३५ वर्षाच्या सत्तेत स्वच्छतेसाठी करोडो रूपयांचा निधी मिळाला पण आज बीडचा किती कचरा झाला? याला जबाबदार कोण?

**आजसाठी एवढंच पुढील अंकात अजुन यांचे कारनामे आपल्या समोर आणण्यात येईल. म्हणूनच तुम्हाला कळकळीची विनंती आहे की, २ तारखेला आपल्याला योग्यच बटन दाबायचे, आपल्याला बीडचा विकास करायचा, भकास नको...**

उमेदवार प्रेमलता पारवे माझ्या आई समान-शेख मुजीब

# भिमाच्या लेकीसाठी मिमचे बंदे तगडबंद



बीड, (दिव्य न्युज):- बीडच्या नगर परिषदेमध्ये सर्वच पक्षाचे उमेदवार अराजकीय आहेत वगळून तुतारी. राष्ट्रवादी पक्षाने नायब तहसिलदार म्हणून निवृत्त झालेल्या दलितमित्र मनोहर वंजारे यांच्या कन्या प्रेमलता पारवे यांना शेवटच्या घटकात घडी दिली. मुस्लिमांनी ज्या तुतारीला लोकसभेत, विधानसभेत गुलाल दिला त्या तुतारीने नगर परिषदेच्या निवडणुकीत मुस्लिमांच्या हातावर मात्र तुरी दिल्या. मुजीबच्या रुपात पारवे यांची उमेदवारी देण्याची कबुली आजी-माजी आमदारांनी दिलेली असताना ऐन वेशीत मुजीबच्या माथी नकार मारला. मात्र याचवेळी मुस्लिम नेत्यांनी त्यांच्या नेत्याकडे म्हणजे अजित पवार यांच्याकडे मुजीब यांचा प्रस्ताव सरकवला. राष्ट्रवादीने फारसा विचार न करता अल्पसंख्यांक समाज एकगठ्ठ्याने एका भिमाच्या लेकीसोबत राहणार असेल तर विजयाचे सोपे समीकरण शक्य आहे, म्हणूनच पारवे यांची उमेदवारी निश्चित झाली. आज त्या ▶▶ पान २ वर

# सतीषअप्पा पवार यांच्या छत्रीवर पडणार मतांचा जोरदार पाऊस

## अपक्ष उमेदवार असलेले सतीषअप्पांच्या छतीला भरभरून मते देवून निवडून देण्याचे निर्धार

बीड, (दिव्य न्युज):- बीड शहरातील प्रसिध्द समाजसेवक तथा माजी नगरसेवक सतीषअप्पा पवार हे प्रभाग क्रं. १९ मधून अपक्ष नगरसेवक म्हणून निवडणूकीच्या रिंगणात उतरले आहेत. काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या त्यामुळे पक्षातून बाजुला होत अपक्ष उमेदवार म्हणुन निवडणूक लढविण्याचे.... सतिषअप्पा पवार यांच्या समर्थकांनी ठरविले आणि झालं ही तसेच.. सतिष अप्पा पवार यांनी अपक्ष म्हणुनच उमेदवारी अर्ज दाखल केला त्यांना छत्री हे चिन्ह मिळाले. आता आप्पांनी प्रचारात जोरदार मुसंडी मारली असून अवघ्या दोन दिवसातच त्यांनी संपूर्ण प्रभाग पिंजून काढला आहे. सतिषअप्पा हे मागील पंधरा वर्षापासून या प्रभागाचे नगरसेवक आहेत. या पुर्वी त्यांचे वडील राजेंद्र पवार हे वीस वर्षे या प्रभागाचे नगरसेवक राहिले. पवार परिवारांचा प्रत्येकांशी मैत्रीपुर्ण संबंध असून कोणत्याही जातीधर्माचा असो प्रत्येकांच्या सुख दु:खात धावून येणारा हा पवार परिवार आहे. सन उत्सवात प्रत्येकांच्या उत्सवात ▶▶ पान २ वर



# केशरकाकूच्या धर्मनिरपेक्षक राजकारणाचे खरे वारसदार संदीपभैय्या





संदीपभैय्यांच्या तुतारीची मतदारात जोरदार हवा

**बीड , (दिव्य न्युज):- बीडच्या पहिल्या महिला खासदार केशरकाकू क्षीरसागर यांनी आयुष्यभर माणूस हीच जात या विचारावर काम करत समाजात कधीही जात-धर्माचा भेद निर्माण होऊ दिला नाही. चार मुलांप्रमाणेच माजी आमदार सय्यद सलीम यांना ही त्यांनी आपल्या मुलासारखे जपले. त्याच मूल्यांची परंपरा आज त्यांचे खरे वारसदार आ. संदीप क्षीरसागर सक्षमपणे पुढे नेत असल्याची बीड शहरात जोरदार चर्चा आहे. संदीप भैय्याच काकूंच्या सर्वसमावेशक राजकारण आणि समाजकारणाचे वारस आणि दिपस्तंभ असल्याची बीडकरांमध्ये चर्चा आहे.**

समाजात तणाव निर्माण करुन मताचे राजकारण करणाऱ्या पक्षात क्षीरसागर दिसून येत आहेत. पण अशा काळात ही केशरकाकूंप्रमाणेच आ. संदीप क्षीरसागर हे सर्व समाजघटकांना सोबत घेऊन राजकारण करत आहेत. शहरातील प्रत्येक नागरिकाला आपल्या तळहाताच्या फोडाप्रमाणे जपण्याची वृत्ती त्यांनी कायम ठेवली आहे. शहरातील कोणतीही समस्या असो जसे स्वच्छता, वीजप्रश्न किंवा पाणीटंचाई आ. क्षीरसागर तातडीने रस्त्यावर उतरून नागरिकांना दिलासा देताना दिसतात. त्यांच्या या कार्याची दखल बीडकरांनी प्रत्येक निवडणुकीत घेतली असून विधानसभा निवडणुकीत मिळालेला व्यापक पाठिंबा हेच त्याचे उदाहरण आहे. काकूंनी जसे माणसामाणसात अंतर निर्माण होऊ दिले नाही, त्याचप्रमाणे सर्व समाजांना सोबत घेऊन काम करण्याची भूमिका आ. संदीप भैय्यांनी आजही कायम ठेवली आहे. त्यामुळे बीडकर त्यांना कधीच एकटे पडू देत नाहीत, उलट त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतात. मात्र, दुसरीकडे काही जणांचे काम फक्त टीका करणे इतकेच मर्यादित राहिले आहे. विकास, नागरिकांचे प्रश्न आणि प्रत्यक्ष काम यांपासून दूर असलेले काही नेते जे शहरात गाडीचे काच लावून फिरतात आणि निवडणुकीतच पायी चालताना दिसतात त्यांना बीडकरांनी ओळखले आहे, असा सूर शहरातील चर्चेतून जाणवतो. यामुळे येत्या २ तारखेला बीडमध्ये पुन्हा 'तुतारी' वाजणार असून, माणसांपेक्षा आपल्या मोठ्या पणाला महत्त्व देणाऱ्यांना मतदार त्यांच्या मतांनी योग्य उत्तर देणार, अशी जोरदार चर्चा शहरात सुरू आहे.

## “ बीडकर म्हणतात रस्त्यावर असणारा माणूस हवा घरात बसणारा नव्हे “

**बीड शहरात कोणतीही समस्या ती सोडविण्यासाठी आ. संदीप भैय्या क्षीरसागर हे नेहमीच रस्त्यावर उभे राहून कामे करुन घेतात. शहर वासियांना कोणतीही समस्या असेल ते सोडविण्यासाठी प्रयत्न करतात. पण काहीजणांना फक्त निवडणूक आली की, सामान्य माणूस दिसतो. त्याचवेळी त्यांना शहराच्या समस्या आणि लोकांच्या अडचणीचा साक्षात्कार होतो. हे बीडकरांनी ओळखले असून आता ते म्हणत आहेत की, आम्हाला रस्त्यावर उतरुन कामे करणारा माणूस हवा घरात बसून स्वत: चे मोठेपण मिरवणारा नको. यामुळे बीडकरांचा कौल कोणाला हे दिसून येत आहे.**

# आ.धनंजय मुंडेंचं घर कोणामुळे फुटलं ?

# ज्याचा मी जीव वाचवला, ज्यासाठी माझं घर फुटलं, आज तोच माझ्यासाठी बेईमान झाला

परळी, (दिव्य न्युज):- नगरपरिषद निवडणुकीच्या तोंडावर परळीचे राजकारण अधिक तापत असून महायुतीच्या प्रचारसभेत माजी मंत्री आणि आमदार धनंजय मुंडे यांनी जोरदार भाषण करत राष्ट्रवादी शरद पवार गटात गेलेल्या दीपक देशमुख यांच्यावर जोरदार टीका केली.



धनंजय मुंडे म्हणाले की, ज्याचा मी जीव वाचवला, ज्याच्यासाठी माझं घर फुटलं, आज तोच माणूस माझ्याशी बेईमान झाला. त्याने तर देवाला सोडलं नाही. वैद्यनाथ मंदिरावर हातोडा चालवला. त्याला मतदान देणार का? असा सवाल उपस्थित करत त्यांनी दीपक देशमुख यांच्यावर निशाणा साधला. पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले की, त्याने माझ्याशी गद्दारी केली. अपघातात हात तुटला तेव्हा ४० लाख रुपये मी दिले, पण तो गद्दार झाला, असं म्हणत त्यांनी दीपक देशमुख यांच्यावर टीका केली. परळी नगर परिषद निवडणुकीच्या प्रचारार्थ आमदार धनंजय मुंडे व त्यांच्या पत्नी राजश्री धनंजय मुंडे यांच्या परळीच्या वेगवेगळ्या प्रभागात रॅलीत सहभागी झाले. आज आमदार धनंजय मुंडे यांनी सकाळपासूनच प्रभागांमध्ये रॅलीच्या माध्यमातून नागरिकांशी संवाद साधून गाठीभेटी घेतल्या. यावेळी ठिकठिकाणी मुंडे यांचे स्वागत करण्यात आले. स्वागतादरम्यान नागरिकांकडून धनंजय मुंडे यांना हार घातला जात असताना 'मला नको तर प्रभागातील उमेदवाराला हार घाला', असे मुंडे नागरिकांना म्हणाले. या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.दरम्यान, आमदार धनंजय मुंडे यांच्या पत्नी राजश्री मुंडे या नगर परिषद प्रचाराच्या मैदानात उतरल्याचे पाहायला मिळाले. आज राजश्री धनंजय मुंडे यांनी परळीमध्ये महायुतीच्या उमेदवारासाठी प्रचार फेरी काढली. सावता माळी मंदिरात नारळ फोडत त्यांनी प्रचारफेरीला सुरुवात केली. प्रचारफेरीदरम्यान राजश्री मुंडे यांचे नागरिकांकडून स्वागत करण्यात आले. त्यांचे महिलांकडून औक्षण देखील करण्यात आले. महायुती आणि धनंजय मुंडे यांच्या बाजूने वातावरण असून जातीपातीवर नाही तर विकासावर मतदान होणार असून त्यांनी महायुतीच्या विजयाचा विश्वास व्यक्त केलाय.

# फडणवीस, शिंदे, अजितदादांकडून प्रत्येक नगरपालिकेसाठी १० कोटीच बजेट ?

मुंबई, (दिव्य न्युज):- ठाण्यासारख्या शहरांत कोट्यवधींची कामे फक्त कागदावर दिसतात. प्रत्यक्षात ही कामे झालीच नाहीत. मुंबईत दोन लाख कोटींची कामे महापालिकेच्या माध्यमातून काढली. ती प्रत्यक्ष जमिनीवर दिसलीच नाहीत. हे दोन लाख कोटी ठेकेदारांच्या माध्यमातून नगरपालिकेच्या निवडणुकीत आले आहेत. गुलाबराव पाटलांनी तेच जाहीर केले. प्रत्येक नगरपालिकेत मिंधे, अजित पवार, भाजप साधारण दहा कोटी रुपये खर्च करीत असल्याची माहिती धक्कादायक आहे. सत्तेतल्या तिन्ही पक्षांचे बजेट हजार ते बाराशे कोटी असावे. हा पैसा कोणत्या मार्गाने येतो? फडणवीस नागपूरच्या शेतीतून हा पैसा आणत नाहीत, मिंधे सातारच्या शेतीतून हा पैसा मिळवत नाहीत आणि अजित पवार बारामतीमधील द्राक्ष व उसातून हा पैसा पिकवत नाहीत. म्हणजेच हा पैसा लुटीतून आणि भ्रष्टाचारातून मिळवला आहे, असा आरोप ठाकरेसेनेने केला आहे.'सत्तेतून पैसा, त्याच पैशांतून पुन्हा सत्ता व पैसा' या चक्रात महाराष्ट्राचे राजकारण गुंतले आहे. चंद्रशेखर बावनकुळे कार्यकर्त्यांना जाहीरपणे सांगतात, ''माझ्याकडे चिक्कार पैसा आहे. पैशांची चिंता करू नका. तुम्ही निवडणुका जिंका.'' गुलाबराव पाटलांनी तेच जाहीर केले. गुलाबराव पाटील यांच्यासारख्या बेताल, भ्रष्ट मंत्र्यावर निवडणूक आयोगाने काय कारवाई केली? नगरविकास खात्यात भ्रष्टाचाराचा माल आहे, हे गुलाबराव पाटील सांगतात. महाराष्ट्राचे लाचलुचपत प्रतिबंधक खाते यावर काय कारवाई करणार आहे?



मतदाराला विकत घेण्याची भाषा त्यांनी केलीच, पण महाराष्ट्राचा मतदार विकाऊ आणि भ्रष्ट मानसिकतेचा आहे अशी अपमानास्पद भाषा त्यांनी वापरली. पैशांनी विजय मिळवता येतो. मतदार, निवडणूक यंत्रणा पैशांनी विकत घेता येते व आम्ही ती विकत घेतल्याचे वक्तव्य गुलाबराव पाटीलसारखे मंत्री करतात आणि निवडणूक आयोग मुर्दाडासारखा ते वक्तव्य फक्त ऐकून शांत बसतो. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना भ्रष्ट व मूर्खांचा गराडा पडला आहे. अर्थात, हा फडणवीसांचा प्रश्न आहे, पण महाराष्ट्र मात्र त्यामुळे रोज बदनाम होत आहे त्याचे काय? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित करण्यात आला आहे.

## प्रभाग क्रं. १७ मधील मतदारांनी घेतली हातात निवडणूक

# फारुक पटेल, नुझत आरा शहाबाज यांना नगरसेवक करायचंच

बीड, (दिव्य न्यूज):- बीड शहरातील प्रभाग क्रं. १७ च्या निवडणुकीकडे बीडकरांचे लक्ष लागून आहे. कारण या प्रभागातून बीड शहराचा विकासाचा चेहरा मोहरा बदलणारे आणि विकास काय असतो हे स्वत:च्या प्रभागात करून दाखविणारे नगरसेवक म्हणजे फारूक पटेल. फारूक पटेल यांचे काम कामचं बोलले. प्रभागात दर्जेदार सिमेंट रस्ते, पाईपलाईन, विद्युत चे कामे, स्वच्छतेचे कामे, पाण्याचा प्रश्न त्यांनी कायमचे निकाली काढले आहेत. स्वत:च्या प्रभागात मुभलक आणि भरपुर पाणी मिळावे या करीता हजारो लिटरची पाण्याची टाकीच उभी केली.





सामाजिक काम असो का [illegible] काय प्रत्येकांना आठवण येते ते म्हणजे फारूक पटेल यांची.... रोड, नाली, रस्ता हिच कामे फारूक पटेल करत नाहीत तर त्यांचे सर्वात महत्वाचं आणि जबाबदारीचे काम म्हणजे रूग्णांना मदत करायची. रात्री अपरात्री कितीही वाजता त्यांना फोन केला तर ते मागे पुढे न पाहता अडचणीत आलेल्यांना मदत करण्यासाठी तात्काळ दवाखान्यात धाव घेतात. कोविडच्या काळात केलेले त्यांचे काम कोणीही कधी ही विसरणार नाही. त्या काळात एखादा व्यक्ती कोरोना बाधीत झाल्यावर त्या रूग्णाकडे कोणीही जात नव्हते. स्वत:चे नातेवाईक आणि उपचारा करणारे लांब राहुन उपचार करत होते. अशा या कठीण काळात फारूक पटेल यांनी आपले कर्तव्य समजून या रूग्णांना मदत केली. हे ते रूग्ण कधीच विसरणार नाहीत. प्रभागच नव्हे तर संपूर्ण शहरात कसा विकास कामे करता येतील याकडे त्यांचे लक्ष असते. प्रत्येक कामांकडे त्यांचे बारकाईने लक्ष असते अशा या अतिउत्तम कामगिरी करणाऱ्या फारूक पटेल यांना प्रभागातील मतदारांनी भरभरून प्रतिसाद देण्याचे वचन दिले असून त्यांच्या सोबत असणारे शेख जमील भाई यांचे सुन स्व.शाहबाज उर्फ शब्बो यांची पत्नी निवडणुकीच्या रिंगणात असून या दोघांनाही मतदारांकडून भरभरून प्रतिसाद मिळत आहे.

### शाहबाज उर्फ शब्बो यांचा नगरसेवक होण्याचे स्वप्न प्रभागातील मतदार पूर्ण करून देण्यासाठी सरसावले

ही बातमी करतांना अक्षरशः डोळ्यात पाणी येत आहे. त्याचे कारण शेख जमिल भाई यांचे सुपुत्र आणि प्रत्येकांच्या सुख दु:खात नेहमी सहभागी असणारे आणि प्रत्येकांशी प्रेमाने बोलणारे स्व.शाहबाज उर्फ शब्बो यांचे नगरसेवक होण्याचे स्वप्न होते. ते त्यासाठी अनेक वर्षापासून प्रयत्न करत होते. पण काही महिन्यापुर्वी त्यांचे एक मोठ्या आजाराने दुर्देवी निधन झाले. पण आज प्रभागातील मतदारांना त्यांची आठवण येत आहे. शाहबाज उर्फ शब्बो यांचे नगरसेवक होण्याचे स्वप्न होते. ते त्यासाठी रात्रंदिवस सामाजिक कार्यात अग्रेसर होते. पण ते त्यांच्या नशीबी नव्हते. आज मतदारांच्या हाती त्यांचे स्वप्न पुर्ण करण्याची संधी मिळाली म्हणूनच मतदारांनी ठरविले की, शाहबाज उर्फ शब्बो यांच्या पत्नी नुझत आरा यांना नगरसेवक करून शाहबाज उर्फ शब्बो यांचे अपुर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याचे विडाच मतदारांनी उचललेला आहे.






पान १ वरून

## भिमाच्या लेकी

प्रेमलता पारवे यांच्यात आपण आपली आई पाहतो असे भावनिक उद्गार मुजीब यांनी केले आणि आंबेडकरी चळवळीत मुजीब यांच्या वक्तव्याचे स्वागतही झाले. मुस्लिम एकवटले असले तरी ते काय मुस्लिम उमेदवाराला खुर्चीत बसविण्यासाठी नाही तर मुजीब यांनी आईचा दर्जा दिलेल्या भिमाच्या लेकीसाठी रणांगणात उतरले आहेत.

बीड नगर परिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस-शिवेसना-शिवसंग्राम मित्र पक्षाचे उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्या प्रचारार्थ त्यांचे जावई संपादक शेख मुजीब यांनी मुस्लिम बहुल भागात विविध प्रभागात भेटी देऊन मतदारांशी संवाद साधला. शेख मुजीब यांनी मतदारांशी संवाद साधताना भावनिक होऊन आशिर्वाद मागितले. प्रेमलता पारवे या जरी माझ्या सासू असल्या तरी मी त्यांच्यात आई पाहतो. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने या भिमाच्या लेकीला उमेदवारी जाहिर करून आंबेडकरी विचाराला चालना दिली आहे. आई समान असलेल्या प्रेमलता पारवे यांच्या विजयासाठी माझा मुस्लिम बांधव एकगठ्ठा माझ्या पाठिशी आहे आणि त्याबळावरच विजय निश्चित आहे असेही शेख मुजीब म्हणाले.

दरम्यान शेख मुजीब यांच्या वक्तव्याचे दलित आणि मुस्लिम समाजात स्वागत झाले असून दलित मतदारांसोबतच मुस्लिम मतदारही एकवटले आहेत. विरोधक कितीही आरोप करत असले तरी श्रीमती प्रेमलता पारवे यांनी प्रचारात घेतलेली आघाडी कोणीही रोखू शकत नाही. आ. विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे निरीक्षक माजी आ. संजय दौंड, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिल जगताप, शिवसंग्रामच्या डॉ.ज्योतीताई मेटे, सावता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण आखाडे, माजी नगरसेवक दिलीप गोरे, शेख निजाम, बळीराम गवते, फारुक पटेल यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस-शिवसेना-शिवसंग्राम-सपा पक्षाचे पदाधिकाऱ्यांनी श्रीमती प्रेमलता पारवे आणि सर्व ५२ उमेदवारांच्या प्रचारासाठी मुठ बांधली असून बीड शहरात त्यांच्या पॅनलचे पारडे जड झाले आहे. प्रत्येक प्रभागात राष्ट्रवादीच्या घड्याळाचा गजर होत असून गेल्या अनेक वर्षांपासूनचा विकासाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी या निवडणुकीत परिवर्तन होणार असल्याची चर्चा सर्वत्र होत आहे.

## सतीषअप्पा पवार

उपस्थित राहुन त्यांच्या उत्सवात सहभागी होत आहेत. सतिषअप्पा पवार यांनी प्रभागात करोडो रूपयांचा निधी खर्च करून विकास कामे केली आहेत. सर्वात महत्वाचे काम त्यांचे म्हणजे त्यांच्या प्रभागात हिंदू आणि मुस्लिम या दोन्ही समाजाचे मोठे देवस्थान आहे. एक कंकालेश्वर मंदिर आणि दुसरे दर्गा हजरत शहेंशाहवली या दोन्ही देवस्थानाला राज्यातील व राज्याबाहेरील भक्त दर्शनाला येतात. या दोन्ही देवस्थानला जाणारा रस्ता अत्यंत खराब झाला होता. अप्पांनी याकडे लक्ष दिले, यासाठी करोडो रूपयांचा निधी मंजूर करून आणले आणि दर्गा हजरत शहेंशाहवली ते चांदणी चौकापर्यंत अत्यंत दर्जेदार सिमेंट रस्ता केला. त्यामुळे भावीकांना याचा आज मोठा फायदा होत आहे. त्या प्रमाणेच दोन्ही देवस्थानामध्ये त्यांनी करोडो रूपये खर्च करून भक्ती निवास, उद्यान, शौचालय यासह इतर अनेक महत्वाची कामे केली आहेत. प्रभागात सर्व ठिकाणी अमृत जल योजनेचे काम पूर्ण झाले असून अनेकांना नगर पालिकेतून घरकुल मंजूर करून दिले आहेत. आता पुन्हा सतिष अप्पा हे अपक्ष म्हणून उमेदवार असून त्यांचे निवडणूक चिन्ह छत्री आहे. विकासाची गंगा आणणाऱ्या सतिष पवारांना चौथ्यांना निवडून आणण्याचा विडा मतदारांनी उचलला आहे.